महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

**स्मरणपत्र :**

जा.क्र.तं.शि.विकापु/विवि-१/नोदणी शुल्क/२०२०/ 2242
दिनांक : 24 AUG 2020

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या
सर्व खाजगी विनाअनुदानित संस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेत शासनाने मान्यता दिलेल्या अभ्यासक्रमांचे नोंदणी शुल्क जमा न केलेल्या संस्थांनी नोंदणी शुल्क जमा करण्याबाबत.**

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.तंशिविकापु/विवि/नवीन संस्था २०२०-२१/२०२०/७९१, दि. १२/०२/२०२०.
२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचा शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४, दि. २२/०२/२०१८.

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यांत येते की, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षासाठी पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेत अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, प्रवेश क्षमतेत घट, नवीन अभ्यासक्रम तसेच पीजीडीएम अभ्यासक्रमाची नवीन संस्था स्थापन करणे याकरीता, वरील **संदर्भ क्र. २** येथील शासन निर्णयात नमूद केल्यानुसार नोंदणी शुल्क भरणे आवश्यक असल्यामुळे, या कार्यालयाने वरील **संदर्भ क्र. १** अन्वये सर्व संबंधित खाजगी संस्थांच्या संस्थाप्रमुखांना याबाबत पूर्तता करण्याविषयी कळविले होते.

सद्यस्थितीत शासनाने, शासन निर्णय निर्गमित करुन पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेत अभ्यासक्रमाच्या प्रवेश क्षमतेत वाढ, प्रवेश क्षमतेत घट, नवीन अभ्यासक्रम तसेच पीजीडीएम अभ्यासक्रमाची नवीन संस्था स्थापन करणे याकरीता, मान्यता दिलेली आहे. **परंतु ज्या संस्थांना मान्यता देण्यात आलेली आहे, त्यापैकी काही संस्थांनी अद्याप वर नमूद केलेल्या शासन निर्णयानुसार शासनाचे नोंदणी शुल्क या कार्यालयास जमा केलेले नाही,** अशा संस्थांनी सोबत जोडलेल्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार नोंदणी शुल्क या विभागीय कार्यालयास जमा करण्यात यावे अन्यथा, मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचेकडून देण्यात येणा-या अंतिम मान्यतेस अडथळा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

सदर नोंदणी शुल्काचा धनाकर्ष **Joint Director, Technical Education Regional Office, Pune** यांच्या नांवे काढण्यात यावा. काढलेला धनाकर्ष या कार्यालयात **दि. २८.०८.२०२० पर्यंत** जमा करण्यात यावा

(डॉ..दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ 020-25656234 Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


जा. क्र.- तंशिविकापु/विवि/नवीन संस्था २०२०-२१/२०२०/ 791 दिनांक : १२/०२/२०२०

प्रति
प्राचार्य /संचालक
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत

संदर्भ – १) मा संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे परिपत्र क्र २/एनजीसी/न.प्र.त/२०२०/२५९ दिनांक १०/०२/२०२०.
२) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे परिपत्र क्र २/एनजीसी/मान्यता/२०२०/२५८ दिनांक १०/०२/२०२०.
३) शासन निर्णय क्र टीईएम-२०१८/प्र क्र २३/तांशि ४ दिनांक २२/०२/२०१८.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सुचनेव्दारे (PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS 2020-21) एआयसीटीई अॅप्रुव्हल प्रोसेस हॅडबुक २०२०-२१ मधील मार्गदर्शक सुचनेच्या आधारे ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०६/०२/२०२० ते दिनांक २९/०२/२०२० पर्यत व विद्यमान संस्थासाठी दंड भरुन मान्येतस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०५/०३/२०२० हा निर्धारीत केला आहे. त्यानुसार व्यावसाईक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता दिनांक ११/०२/२०२० पासून - www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यमान संस्थांनी संचालनालयाने दिलेल्या संकेतांक व पासवर्डव्दारे लॉगईन करुन दिनांक ०१/०३/२०२० पर्यत व AICTE यांचेकडे दंड भरुन मान्यतेस विस्ताराबाबत सादर केलेल्या आर्जची माहिती दिनांक ०६/०३/२०२० पर्यत भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती (Confirm) करण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून विद्यापीठांशी /मंडळाशी संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका इ. स्तरावर अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र /वास्तूशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट अॅन्ड केटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट/एम सी ए या व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था सुरु करणा-या संस्थांनी संचालनलायाच्या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती माहिती भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती (Confirm) करावी.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये विविध प्रकारच्या प्रस्तावाचे अनुषंगाने खालील प्रमाणे कार्यवाही संस्थांनी करावी.

- विद्यमान व शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून नव्याने सुरु होणा-या संस्थांनी (APH 2020-21 मधील तरतुदीनुसार) संदर्भ क्र ३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क, धनाकर्षाव्दारे, **सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे** (Joint Director, Technical Education Regional Office, Pune ) यांचे नावे काढून या कार्यालयास जमा करावा. सदर धनाकर्ष या कार्यालयास जमा केल्यानंतर प्राप्त होणा-या शासकीय पावतीची साक्षांकीत प्रत, प्रस्तावासोबत या कार्यालयास सादर करावी. ज्या संस्था

नोंदणीशुल्क जमा करणार नाहीत त्यांच्या प्रस्तावाचे अनुषंगाने कार्यवाही करण्यात येणार नाही याची आपण नोंद घ्यावी.

- खालील प्रस्तावाचे अनुषंगाने प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.
  १. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून विद्यापीठ / मंडळ संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था (APH 2020-21 मधील तरतुदीनुसार) सुरु करणे.
  २. एमसीए/एमबीए अभ्यासक्रम संचलित करणा या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे
  ३. विद्यमान संस्थेच्या साईट / लोकेशनमध्ये बदल करणे.
  ४. पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.
  ५. विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) /स्तर (Level) सुरु करणे.
  ६. महिला संस्थेच को- एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट
  ७. विद्यमान संस्था बंद करणे.
  ८. विद्यमान संस्था बंदकरुन तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे
  ९. ट्रस्ट / सोसायटी/ कंपनीच्या नावात बदल करणे.

  वरील अर्जाची प्रत (Hard Copy) संबधित संस्थांनी AICTE च्या ऑन लाईन पध्दतीने सादर केलेल्या दिनांकाच्या, दुसऱ्या किंवा दिनांक ०१/०३/२०२० यापैकी जो आगोदर असेल त्या दिनांकास या कार्यालयास सादर करावा. प्रस्ताव या कार्यालयास सादर करताना प्रस्तावावर ठळक अक्षरात प्रस्तावाचा विषय नमूद करावा.

- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी जाहिर सुचनेत नमुद केलेल्या अर्जापैकी उपरोक्त परिछेद क्रमांक २ मध्ये नमुद केलेले अर्जाव्यतिरीक्त उर्वरीत अर्जाची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळी उपलब्ध करुन दिलेल्या पोर्टलवर भरणे अनिवार्य आहे. सदर भरलेल्या माहितीची प्रत व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाच्या प्रतीसह या कार्यालयास सादर करावी.
- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली व वास्तूकला परिषद नवी दिल्ली, यांना अर्ज केलेल्या अर्जापैकी, ज्या प्रस्तावाची सुनावणी घेण्यात येणार आहे त्याचे स्वतंत्र वेळापत्र संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीताच्या मान्यतेसाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना ऑन लाईन सादर केलेल्या अर्जाची माहिती संचालनालयाने www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवर माहिती भरणे अनिवार्य राहील अन्यथा अशा संस्थांच्या अर्जाच्या अनुषंगाने शासनाचे स्तरावरील औपचारीक कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येणार नाही याची सर्व संस्थांनी घ्यावी.

उपरोक्त संदर्भिय पत्राच्या छायाप्रती आपल्या माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सोबत जोडलेल्या आहेत.

प्र सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक:२/एनजीसी/न.प्र.त/२०२०/ २५९
दिनांक : १३

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,
अमरावती व नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या मान्यता प्रक्रीयेबाबत........

संदर्भ :-१) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेली जाहिरात क्रमांक अॅप्रुव्हल/

२) या संचालनालयाने प्रसिध्द केलेली जाहीर सूचना क्रमांक २(३)/एनजीसी/ मान्यता/२०२०/२५८, दि. १० /०२/२०२०

३) या संचालनालयाने वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेली जाहीर सूचना क्रमांक २/ /एनजीसी/ मान्यता/२०२०/२५७, दि. १०/०२/२०२०

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE ) यांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [Advt.No.:Approval/१२(३)/२०१७] एआयसीटीई अॅप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक २०२०-२१ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०६.०२.२०२० ते दि. २९.०२.२०२० पर्यंत व विद्यमान संस्थांसाठी दंड भरुन मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०५.०३.२०२० हा निर्धारीत केला आहे. त्यासअनुसरुन संचालनालय स्तरावरुन संदर्भ क्रमांक २ व ३ च्या जाहिर सूचना प्रसिध्द केल्या असून त्या आपणांस अग्रेषित केलेल्या आहेत. याबाबत आपल्या स्तरावरुन विनाविलंब खालील कार्यवाही करण्यात यावी.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेस अनुसरून संदर्भ क्रमांक २ व ३ च्या अधिसूचनेतील निर्देश आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संस्थांना आपले स्तरावरुन देण्यात यावेत.

२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या जाहिरातीस अनुसरून विना अनुदान तत्वावर पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये नोंदणी शुल्क निर्धारीत केलेले आहे त्यानुसार आपल्याकडे प्राप्त होणा-या प्रस्तावांच्या अनुषंगाने नोंदणी शुल्क जमा करण्यात यावे. ज्या संस्था नोंदणी / तपासणी शुल्क भरणार नाहीत, अशा संस्थाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही व त्यास संबंधित संस्था / ट्रस्ट सर्वस्वी जबाबदार राहील याची आपल्या स्तरावरुन संबंधितांना जाणीव करुन देण्यात यावी.

३. सदर्भ क्रमांक २ च्या जाहिर सूचनेतील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद अर्ज ज्या सस्थानी AICTE कडे केले असतील अशा संस्थांना सदर प्रस्तावाच्या प्रतीसह आपल्या कार्यालयास संपर्कासाठी सूचित केले आहे. याबाबत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित संस्थेचे नोंदणी शुल्क/तपासणी शुल्क घेऊन आपल्या स्तरावर त्रिसदस्यीय तपासणी समिती नेमण्यात यावी. सदर समितीमध्ये स्थापत्य अभियांत्रिकी किंवा उपयोजित यंत्रशास्त्र किंवा आर्किटेक्चर विभागातील विभाग प्रमुख/प्राध्यापक/सहयोगी प्राध्यापक अशा एका सदस्याचा समावेश करण्यात यावा व सदर समितीने संबंधित शिखर परिषदांच्या च्या मानकाप्रमाणे जमीनीचे सर्व संबंधित कागदपत्रे, उदरहरणार्थ ७/१२ चा उतारा, सर्वे नं., बिगरशेती प्रमाणपत्र, लॅंड

युज सर्टिफिकेट, ऑक्युपेन्सी सर्टिफिकेट, बांधकाम प्रमाणपत्र, कौन्सील ऑफ आर्किटेक्चरचे रजिस्टर आर्किटेक्ट यांनी प्रमाणीत केलेले नकाशे, बांधकामाचे मोजमाप इत्यादी सर्व कागदपत्रांची पडताळणी संबंधित मूळ कागदपत्रावरुन प्रत्यक्ष करण्यात यावी. त्यानुसार संबंधित जागा, इमारत, बांधकाम, निधी, यंत्रसामुग्री व इतर सोयी-सुविधा AICTE ने शैक्षणिक वर्ष २०१०-२१ करीताच्या ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक / वास्तुकला परिषदेने निर्धारीत केलेल्या विहित केलेल्या मानकानुसार सदर सोयी-सुविधा उपलब्ध असल्याबाबत तपासणी करण्यात यावी.

४. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडे सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील संस्थाना आपल्याकडे जमा करण्यास सूचित केले आहे. त्यानुसार आपल्या कार्यालयात प्राप्त प्रस्तावांची पोच देऊन सदर प्रस्ताव आपल्या स्तरावर जतन करण्यात यावेत.

५. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदने निर्धारीत केलेल्या संबंधित प्रस्तावांबाबते शासनाचे अभिप्राय AICTE कडे पाठविण्याबाबतचा कालावधी अत्यल्प आहे. सबब आपल्या कार्यालयाकडे APH २०२०-२१ मधील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या नवीन संस्था सुरु करण्यासाठीच्या अर्जाच्या अनुषंगाने परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केल्यानुसार आपले स्तरावरुन कार्यवाही झाल्यानंतर संबंधित संस्थेचा प्रस्ताव, तपासणी अहवाल आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह दि. ०५.०३.२०२० पर्यंत खास दुतामार्फत या संचालनालयास निश्चितपणे उपलब्ध करुन द्यावेत अन्यथा AICTE कडे आपल्यामार्फत विहित कालमर्यादेत प्रस्ताव प्राप्त न झाल्याच्या कारणास्तव शिफारशी पाठविण्यास उशीर झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहील यांची नोंद घ्यावी.

६. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेस खालील प्रस्तावांसाठी संबंधित संस्थाना शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र द्यावयाचे आहे. सदर प्रस्तावांसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक २०२०-२१ मधील Appendix १७.१, १७.३,१७.८ व १७.१६ मध्ये आवश्यक असलेल्या कागदपत्रांची यादी दिलेली आहे. यास्तव आपल्या कार्यालयाकडे येणा-या खालील प्रस्तावा संदर्भातील कागदपत्रांच्या पुर्ततेच्या अनुषंगाने आपले स्तरावर उचित कार्यवाही करुन परिपुर्ण प्रस्तावच या संचालनालयास सादर करावेत.

- विद्यमान संस्थेच्या साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.
- पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.
- विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) / स्तर (Level) सुरु करणे.
- महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट
- विद्यमान संस्था बंद करणे
- विद्यमान संस्था बंद करून तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे
- ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात बदल करणे

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चे मान्यता प्रक्रीयेचे काम विहित मुदतीत पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या विभागातील शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थेतील शिक्षकीय वर्गाच्या सेवा उपलब्ध करुन घ्याव्यात व त्यासाठी संबंधित संस्थाप्रमुखाना आपल्या स्तरावर संबंधितांच्या सेवा आवश्यकतेप्रमाणे प्रथम प्राधान्याने उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात यावेत.

(डॉ. [illegible])
संचालक
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत, सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.

E:\Vijay_06022018\kedar\approval process\2020\notification 2020.docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक: २/एनजीसी/मान्यता/२०२०/२५७
दिनांक : 10 FEB 2020

## सन २०२०-२१ च्या मान्यता प्रक्रीयेसाठी जाहीर सूचना

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE ) यांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS 2020 - 21 ] एआयसीटीई अॅप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक २०२०-२१ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०६.०२.२०२० ते दि. २९.०२.२०२० पर्यंत व विद्यमान संस्थांसाठी वंद भरुन मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यासाठी ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०५.०३.२०२० हा निर्धारीत केलेला आहे. AICTE कडे सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर दि. ११ फेब्रुवारी. २०२० पासून लिंक उपलब्ध करुन देण्यात येत असून याबाबतची विस्तृत जाहिर सूचना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली असून त्यातील सुचनांचे काटेकोर पालन संबंधित संस्थांनी करावे. विद्यमान संस्थांनी त्यांना डिटीई संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉग इन करुन अर्जाची माहिती भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करावी. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून नविन तांत्रिक शिक्षण संस्था (APH २०२०-२१ मधील तरतूदीनुसार) सुरु करण्यासाठी AICTE कडे अर्ज केलेल्या संस्थांनी संचालनालयाच्या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती माहिती भरुन, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करुन प्रस्तावाची प्रत संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांना सादर करावी.

वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांचेकडे वास्तुशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थांनी सादर केलेल्या अर्जाची माहिती संचालनालयाच्या संकेतस्थळावर भरण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

f:\vijay_06022018\kedare\approval process\2020\notification 2020.docx

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in internet : http://www.dtemaharashtra.gov.in

जाहीर सूचना

क्रमांक: २(३)/एनजीसी/मान्यता/२०२०/९६३८
दिनांक : 10 FEB 2020

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE ) यांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS 2020- 21 ] एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०२०-२१ मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक ०६.०२.२०२० ते दि. २९.०२.२०२० पर्यंत व विद्यमान संस्थांसाठी दंड भरून मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०५.०३.२०२० हा निर्धारीत केलेला आहे. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता दि. ११.०२.२०२० पासून http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यमान संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि. ०१.०३.२०२० पर्यंत व AICTE यांचेकडे दंड भरुन मान्यतेस विस्ताराबाबत सादर केलेल्या अर्जाची माहिती दि ०६.०३.२०२० पर्यंत भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून विद्यापीठांशी / मंडळाशी संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका इ. स्तरावर अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र/ वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट / एम.सी.ए. या व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था APH २०२०-२१ मधील तरतूदीनुसार) सुरु करणा-या संस्थानी संचालनालयाच्या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती माहिती भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करावी.

१. विद्यमान व शै.व. २०२०-२१ पासून नव्याने सुरू होणा-या संस्थानी (APH २०२०-२१ मधील तरतूदीनुसार) दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे अदा करण्यात यावे. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करतांना प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.
२. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांना केलेल्या खालील प्रकारच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.
   i. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून विद्यापीठ / मंडळ संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था (APH २०२०-२१ मधील तरतूदीनुसार) सुरु करणे.
   ii. एमसीए / एमबीए अभ्यासक्रम संचलित करणा-या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे
   iii. विद्यमान संस्थेच्या साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.
   iv. पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.
   v. विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) / स्तर (Level) सुरु करणे.
   vi. महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट
   vii. विद्यमान संस्था बंद करणे

viii. विद्यमान संस्था बंद करून तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरु करणे

ix. ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात बदल करणे

वरील अर्जाची प्रत (Hard Copy) संबधित संस्थांनी AICTE च्या ऑन लाईन पध्दतीने सादर केलेल्या दिनांकाच्या दुस-या किंवा दिनांक ०१.०३.२०२० यापैकी जे अगोदर असले त्या दिनांकास सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील औपचारीक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच वरील प्रस्ताव सहसंचालक, तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालये सादर करतांना संबंधित प्रस्तावावर ठळक अक्षरात "-----------------------" (प्रस्तावाचा विषय) नमूद करावा.

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भीन जाहिर सूचनेत नमूद केलेल्या अर्जापैकी परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेले अर्जाव्यतिरीक्त उर्वरीत अर्जाची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळी उपलब्ध करून दिलेल्या पोर्टलवर भरणे अनिवार्य राहील. सबब सर्व संबंधित संस्थाना कळविण्यात येते की, याबाबतची माहिती संचालनालयाचे संकेतस्थळावरील पोर्टलवर भरुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस सादर केलेल्य प्रस्तावाची हार्ड कॉपी व नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीच्या प्रतीसह (मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे जमा करण्यात यावी.

४. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व वास्तूकला परिषद, नवी दिल्ली यांना अर्ज केलेल्या अर्जापैकी या संचालनालयात सुनावण्या घेण्यात येणा-या अर्ज व सुनावण्यांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे या संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्यात येईल.

५ शैक्षणिक वर्ष २०२० २१ करीताच्या मान्यतेसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली याना ऑन लाईन सादर केलेल्या अर्जाची माहिती या संचालनालयाने http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी उपलब्ध करून दिलेल्या लिंक वरती माहिती भरणे अनिवार्य राहील अन्यथा अशा संस्थाच्या अर्जाच्या अनुषंगाने शासनाचे स्तरावरील औपचारीक कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी. तसेच याबाबत संबंधित संस्थांना काही अडचणी आल्यास त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी दि. २२.०२.२०१८ अन्वये शासनाने निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क संबंधित संस्थाकडून घेण्यात यावे. तसेच परिच्छेद क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावाबाबत AICTE ने APH २०२०-२१ मध्ये निर्धारित केलेल्या मानके तसेच वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांचे मानकांनुसार प्रत्यक्ष तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित संस्थानी परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाच्या दिनांकापासून २ दिवसांचे आत खास दुतामार्फत या सचालनालयास सादर करावेत.

२. सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, /१मुख्य कार्यालय, मुंबई.

३. सर्व संबंधित संस्था (संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत)

विना अनुदानित तत्वावर पदवी, पदव्युत्तर पदवी/पदविका, (पदविकोत्तर पदविका) या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या विविध प्रस्तावांकरिता नोंदणी शुल्क आकारणे व संयुक्त खात्यात मुदत ठेव ठेवण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,

हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१८

संदर्भ : १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.९४/तांशि-४, दिनांक २३/५/२०१७

२) संचालक, तंत्र शिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/ २०१७/३९, दिनांक ०८/०१/२०१८

**प्रस्तावना :**

राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील विनाअनुदानित तत्वावर नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था सुरु करणे , सुरु असलेल्या संस्थेत नवीन अभ्यासक्रम सुरु करणे किंवा मंजूर प्रवेश क्षमतेत बदल करणे, पी.आय.ओ. व एनआरआय च्या जागा या संदर्भातील मुदतवाढीबाबत, प्रवेश क्षमता कमी करणे/ अभ्यासक्रम बंद करणे, संस्थेचे स्थलांतर अथवा नावात बदल, परदेशी संलग्नता, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका, पदविकोत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या मंजूर क्षमतेत वाढ करणे, ट्रस्ट/सोसायटी/ कंपनीच्या नावात बदल करणे , महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व को-एज्युकेशन संस्थेचे महिला संस्थेत परिवर्तन करणे , संलग्न विद्यापीठाच्या नावात बदल करणे, पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व पदवी स्तरावरुन पदविका स्तरावर परिवर्तन करणे, मॅनेजमेंटमधील फेलोशिप प्रोग्राम सुरु करणे या प्रस्तावांसाठी आकारावयाचे नोंदणी शुल्क संदर्भाधीन क्र. (१) च्या शासन निर्णयान्वये निर्धारीत करण्यात आले आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या ॲप्रुवल प्रोसेस हॅण्डबुकमध्ये १) पीजीडीएम अभ्यासक्रमांच्या संस्थांचे रूपांतरण एमबीए अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये करणे २) संस्थेतील द्वितीय पाळीच्या अभ्यासक्रमांचे रूपांतरण प्रथम पाळीत करणे ३) संस्थेत सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल करणे या विषयांचा नव्याने समावेश करण्यात आला असून त्यासाठी सुध्दा शुल्क निर्धारीत करणे आवश्यक आहे. हे विचारात

घेऊन उपरोक्त संदर्भाधीन क्र .(१) येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन वर नमूद सर्व विषयांबाबत नोंदणी शुल्क व सुधारीत मुदत ठेव निश्चित करण्यासंदर्भात सर्वसमावेशक शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या मान्यता प्रक्रियेच्या अनुषंगाने संदर्भाधीन क्र.(१) येथील शासन निर्णय अधिक्रमित करुन वर नमूद सर्व विषयांच्या प्रस्तावावरील तंत्र शिक्षण संचालनालयाच्या स्तरावर आकारावयाचे नोंदणी शुल्क व मुदतठेव अनुक्रमे Annexure "A" व "B" नुसार निर्धारीत करण्यात येत आहे.

### Annexure "A"

### विनाअनुदानित पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्था / महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी नोंदणी शुल्क

(रुपये)

| अ. क्र | प्रस्तावाचे स्वरुप | ज्या ठिकाणी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु आहे किंवा सुरु करण्यात येणार आहेत त्या ठिकाणासाठी विहित केलेली नोंदणी शुल्कांची रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मुंबई, ठाणे, नवी मुंबई | पुणे, नागपूर, औरंगाबाद,पिंपरी-चिंचवड, महानगरपालिका क्षेत्र | उर्वरित महानगरपालिका | इतर |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| १. | नवीन अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमांची महाविद्यालये | २,२५,०००/- | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- |
| २. | नवीन अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३. | नवीन अभियांत्रिकी /तंत्रशास्त्र/वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी / एमबीए/ एमएमएस/ एमसीए/ पीजीडीएम/ पीजीडीबीएम अभ्यासक्रमांची पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर/ पदविकोत्तर पदविका महाविद्यालये | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| ४. | सुरु असलेल्या सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये तथा संस्थेत प्रथम वा दुसऱ्या पाळीमध्ये अतिरिक्त / नविन अभ्यासक्रम सुरु करणे व अभ्यासक्रमाच्या मंजूर प्रवेश क्षमतेत वाढ करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| ५. | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित नसलेल्या इतर अभ्यासक्रमांचे प्रस्ताव व इतर अंशकालीक पदविका वा पदविकोत्तर अभ्यासक्रम | ६०,०००/- | ४५,०००/- | ३०,०००/- | १५,०००/- |
| ६. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे तथा संस्थांचे स्थलांतरण | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये तथा संस्था बंद करणे | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ८. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभ्यासक्रमांची दुसरी पाळी व अंशकालीन अभ्यासक्रम सुरु करणे. | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ९. | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत पी.आय.ओ.च्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| १० | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेत एन.आर.आय. च्या जागा व त्यांच्या मुदतवाढीबाबत | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| ११ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयात तथा संस्थेतील मंजूर प्रवेश क्षमता कमी करणे/ अभ्यासक्रम बंद करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या नावात बदल करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| १३ | डयूअल पदवी / इंटिग्रेटेड कोर्सेस | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| १४ | परदेशी संस्था/ विद्यापीठ यांचा सहयोग | ४,५०,०००/- | ३,००,०००/- | २,२५,०००/- | १,५०,०००/- |
| १५ | ट्रस्ट/ सोसायटी/ कंपनीच्या नावात बदल करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| १६ | महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट | १,३५,०००/- | ९०,०००/- | ६७,५००/- | ४५,०००/- |
| १७ | संलग्न विद्यापीठाच्या नावात बदल करणे | नोंदणी शुल्क आकारण्यात येऊ नये | | | |
| १८ | पदविका स्तरावरुन पदवी स्तरावर परिवर्तन व त्याउलट :-नविन अभियांत्रिकी / तंत्रशास्त्र/ वास्तुशास्त्र/ औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांची महाविद्यालये | | | | |
| | (१) पदवी | २,२५,०००/- | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- |
| | (२) पदविका | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| | (३) पदव्युत्तर पदवी / पदव्युत्तर पदविका/ पदविकोत्तर पदविका | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| १९ | मॅनेजमेंटमधील फेलोशिप प्रोग्राम | ४,५०,०००/- | ३,००,०००/- | २,२५,०००/- | १,५०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २० | पीजीडीएम अभ्यासक्रमांच्या संस्थांचे रूपांतरण एमबीए अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये करणे | १,५०,०००/- | १,१२,५००/- | ७५,०००/- | ४५,०००/- |
| २१ | संस्थेतील द्वितीय पाळीच्या अभ्यासक्रमांचे रूपांतरण प्रथम पाळीत करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |
| २२ | संस्थेत सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या नावात बदल करणे | ७५,०००/- | ६०,०००/- | ४५,०००/- | ३७,५००/- |

## Annexure "B"

विनाअनुदानित पदवी,पदव्युत्तर पदवी, पदविका, पदव्युत्तर / पदविकोत्तर पदविका या स्तरावरील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था/ महाविद्यालयातील विविध प्रस्तावांसाठी मुदत ठेव.

(रुपये)

| अ.क्र. | प्रस्तावाचे स्वरुप | प्रथम वर्ष | व्दितीय वर्ष |
|---|---|---|---|
| १. | पदवी अभ्यासक्रमाची नवीन अभियांत्रिकी महाविद्यालये | २२,५०,०००/- | २२,५०,०००/- |
| २. | औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदवी अभ्यासक्रमाची नवीन महाविद्यालये | १२,००,०००/- | १०,५०,०००/- |
| ३. | एमबीए/एमएमएस/एमसीए/पीजीडीएम/पीजी डीबीएम/अभ्यासक्रमाची नवीन पदव्युत्तर पदवी/पदव्युत्तर पदविका महाविद्यालये | १०,५०,०००/- | ९,००,०००/- |
| ४. | पदविका अभ्यासक्रमाची नवीन तंत्रनिकेतने (अभियांत्रिकी) | ९,००,०००/- | ७,५०,०००/- |
| ५. | वास्तुशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था | ७,५०,०००/- | ७,५०,०००/- |
| ६. | संगणक प्रगत अभ्यासक्रमाच्या नवीन संस्था | ३,००,०००/- | ३,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | पदवी/पदव्युत्तर पदवी/ पदव्युत्तर पदविका अतिरिक्त अभ्यासक्रम | ४,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | २२,५०,०००/- |
| ८. | पदविका अतिरिक्त अभ्यासक्रम | ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| ९. | वाढीव प्रवेश क्षमता / पदवी/पदव्युत्तर पदवी (अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मानकान्वये निर्धारीत एका तुकडीसाठी) | १,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १०. | पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम (अंशकालीन) | ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| ११. | एम.ई./एम.टेक./एम.फार्म/ इत्यादी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम | ३,००,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १२. | डयूअल पदवी/ इंटिग्रेटेड कोर्सेस | ४,५०,०००/- प्रति अभ्यासक्रम | |
| १३. | परदेशी संस्था/ परदेशी विद्यापीठ सहयोग | १,००,००,०००/- | १,००,००,०००/- |

२. सदर योजनेची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून करण्यात येत असून सदरहू मुदत ठेव ही १० वर्षापर्यंत बँकेत ठेवण्यात यावी. त्या रकमेचे व्याज संस्थेच्या खात्यात जमा करावे आणि १० वर्षानंतर सदरहू मुदत ठेव संस्थेला परत करण्यात यावी.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०२२२१२१४५८८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Madan Maruti Morve

Digitally signed by Madan Maruti Morve
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2e1bf911362ce57b3616743617 1cb98eb98ed47c7de8b061211b9d7e6e0fc2e3, cn=Madan Maruti Morve
Date: 2018.02.22 12:15:52 +05'30'

( म. मा. मोरवे )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
४. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९,खेरवाडी,अलियावर जंग मार्ग,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
५. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर